# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## ।। प्र क ट न ।।

**विषय:** राज्य मंडळामार्फत मार्च–एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या इ.१०वी व इ.१२वी च्या परीक्षांसाठी आवेदनपत्र भरण्यासाठी आकारण्यात येणारे विलंब शुल्क माफ करण्याबाबत..

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च–एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या दि.२७/१२/२०२१ ते दि.०१/०१/२०२२ व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२वी ) परीक्षेच्या दि.१९/१२/२०२१ ते दि.२८/१२/२०२१ पर्यंत विलंब शुल्काने आवेदनपत्र भरणेबाबत तारखा जाहीर करण्यात आलेल्या होत्या.

तथापि सन २०२२ च्या इ.१०वी व इ.१२वी च्या परीक्षेसाठी आवेदनपत्र भरणाऱ्या विद्यार्थ्यांना विलंब शुल्क आकारण्यात येऊ नये/विलंब शुल्क माफ करण्यात यावे. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षेच्या आदल्या दिवशीपर्यंत ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी असे शासनाने पत्र क्र.लवेसू–२०२१/प्र.क्र. ९७/एसडी–२ दि.२८/१२/२०२१ च्या पत्रान्वये कळविलेले आहे.

त्याअनुषंगाने सदर सुविधा मार्च–एप्रिल २०२२ या वर्षापुरतीच मर्यादित राहील. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी)परीक्षा माहे दि.१५/०३/२०२२ व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२वी ) परीक्षा माहे दि.०४/०३/२०२२ पासून सुरु होत असल्याने परीक्षेच्या एक दिवस अगोदर (आदल्या दिवसा) पर्यंत ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरण्याची सुविधा नियमित शुल्काने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तरी याबाबतची सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व माध्यमिक शाळा,उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये, शिक्षक , विद्यार्थी, पालक व इतर संबंधित घटकांनी नोंद घ्यावी.

( अनुराधा ओक )
प्र.सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४

दि.२९/१२/२०२१